# सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी 'साय-फाय' एकांकिका स्पर्धा

**मुंबई :** क्विक हील फाऊंडेशन, थिएटर ॲकॅडेमी आणि महाराष्ट्र सायबर पोलीस यांचा संयुक्त उपक्रम साय-फाय करंडक एकांकिका स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्यातून प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. कॉलेज, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून प्रवेशिका १५ नोव्हेंबर २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येतील. सहभागी टीम नाट्य वर्तुळात नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. साय-फाय करंडक २०१८ मध्ये नोंदणी करण्यासाठी ८३९००४१३९ / ९६५७४४२९५७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. साय-फाय करंडक २०१८ मध्ये अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या एकांकिका १६ डिसेंबर २०१८ रोजी ग्रँड फिनालेमध्ये सादर होतील व त्यावेळी या कलाकारांना नाटक, सिनेमा आणि टीव्हीवरील मान्यवर कलाकारांच्या ज्युरी पॅनलसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल.